आधुनिक विचारांचे

# वर्तमान




बीड । मंगळवार, २२ फेब्रुवारी २०२२ । वर्ष : ४

आपले वृत्तपत्र, आपला आवाज

अंक : १६ । पाने : ४ । मूल्य २ ₹

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क

9423209823

मुख्यालय : 'शिवगड' २३,
मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

# कोरोना रुग्णांचा आकडा शून्यावर

## बीड जिल्ह्यातील आशादायक चित्र

प्रतिनिधी

बीड : आरोग्य विभागाच्या सोमवारच्या अहवालानुसार कोरोना चाचणीत एकही रूग्ण आढळून आला नाही. रूग्णसंख्या सोमवारी शून्यावर आल्याने जिल्हावाशियांसाठी आशादायी चित्र आहे, अशा प्रतिक्रिया उमटत आहेत.



बीड जिल्ह्यात कोरोनाची तिसरी लाट संपुष्टात आली असून सोमवारच्या चाचण्यांमध्ये जिल्ह्यात कोरोनाचा एकही नवा रूग्ण आढळून आला नाही. आरोग्य विभाग व जिल्ह्यासाठी ही दिलासादायक बाब असून दिवसभरात १७ रूग्णांनी कोरोनावर मात केली आहे. सध्या केवळ ६८ रूग्ण सक्रीय आहेत. जिल्ह्यात कोरोनाच्या तिसऱ्या लाटेच्या अनुषंगाने मोठी चर्चा झाली. कोविड केअर सेंटर तयार केले गेले, ऑक्सिजन प्लांट तयार केले गेले. आरोग्य विभाग तिसऱ्या लाटेला भिडण्यासाठी सज्जही झाला होता. मात्र, जिल्ह्यात तिसरी लाटेचा प्रभाव फारसा दिसून आला नाही. कोविड केअर सेंटरच्या वापराचीही गरज पडली नाही. आता तिसरी लाटही संपुष्टात आल्याची चिन्हे असून सोमवारी नवा एकही रूग्ण आढळून आला नाही.

आरोग्य विभागाच्या सोमवारच्या अहवाला नुसार, २४८ जणांची कोरोना चाचणी केली गेली. यात, सर्व अहवाल निगेटिव्ह आले. दरम्यान, बीड जिल्ह्यातील एकूण बाधितांची संख्या आता १ लाख ८ हजार ३३८ इतकी झाली आहे तर, कोरोनामुक्त झालेल्यांचा आकडा १ लाख ५ हजार ३८३ इतका झाला आहे.

आतापर्यंत २ हजार ८७० जणांचा बळी गेला आहे. अशी माहिती जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

## कोरोनाबाबतचे नियम पूर्णतः शिथील होण्याच्या मार्गावर?

मुंबई : राज्यभरात कोरोनाचे रुग्ण कमी होऊ लागल्याने राज्य पुन्हा एकदा अनलॉकच्या दिशेने वाटचाल करू लागले आहे. त्यामुळे येत्या दोन दिवसांत अनेक निर्बंध शिथिल करण्यासंदर्भात राज्य सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. याचा आढावा घेण्यासाठी मुख्य सचिव आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या अधिकारी यांच्यामध्ये बैठका पार पडल्या आहेत. यावर आता लवकरच मुख्यमंत्री अंतिम निर्णय घेणार आहेत.

'हे' निर्बंध शिथिल होण्याची शक्यता : चित्रपटगृहे , मॉल्स आणि इतर ठिकाणी प्रवेश देताना लसीचे दोन डोस बंधनकारक करण्यात आले आहेत. यात शिथिलता मिळण्याची शक्यता. रेल्वे किंवा बसने प्रवास करताना लसीचे दोन डोस बंधनकारक केले आहेत. त्यामध्येही शिथिलता मिळण्याची शक्यता आहे. राज्यातील ब्युटी सलून आणि केश कर्तनालय पूर्ण क्षमतेने चालवण्यास परवानगी द्यायची शक्यता. मनोरंजन व उद्याने जलतरण तलाव, वॉटर पार्क यांनाही पूर्ण क्षमतेने सुरू ठेवण्याच्या परवानगी देण्याची शक्यता. सध्या नाट्यगृह चित्रपटगृह ५० टक्के क्षमतेने सुरू आहेत, तेही पूर्ण क्षमतेने सुरू करण्याची शक्यता आहे. हॉटेल, रेस्टॉरंट, उपहारगृह यांनाही पूर्ण क्षमतेने आणि नियमित वेळेत सुरू ठेवण्याची परवानगी देण्याची शक्यता आहे. दरम्यान, ज्यांचे दोन डोस पूर्ण झालेले आहेत. त्यांनाच प्रवेश देण्याच्या निर्णयावरून मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी राज्य सरकारला फटकारले आहे. त्यानंतर आता राज्य सरकार तातडीने यावर निर्णय घेण्याची शक्यता आहे.

## फास्टट्रॅकन्यूज

### महाराष्ट्र अ‍ॅण्ड गोवा बार कौन्सिलच्या अध्यक्षपदी अ‍ॅड.वसंतराव साळुंके

माजलगाव : महाराष्ट्र अ‍ॅण्ड गोवा बार कौन्सिलच्या अध्यक्षपदी बीड जिल्ह्याचे भुमिपूत्र तथा माजलगाव तालुक्या तील सादोळ्याचे रहीवाशी अ‍ॅड.वसंतराव साळुंके यांची तर उपाध्यक्ष म्हणून पुणे येथील अ‍ॅड.राजेंद्र उमाप यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलची मुंबई येथील कार्यालयात २० फेब्रुवारी रोजी परिषदेचे मावळते अध्यक्षअ‍ॅड.गजानन चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत सर्वानुमते अ‍ॅड.वसंतराव साळुंके यांचे नाव पुढे आले. महाराष्ट्र, गोवा बार कौन्सिलच्या परिषदेवर चौथ्यांदा निवडून आलेले अ‍ॅड.वसंतराव दिगंबरराव साळुंके गेल्या अनेक वर्षापासून मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात वकीली व्यवसाय करतात. या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



### दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना मिळणार क्रिडा गुण

मुंबई : दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना क्रीडास्पर्धेतील सहभागाच्या आधारावर सवलतीचे गुण देण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी दिली. कोरोनामुळे उद्भवलेल्या असामान्य परिस्थितीमुळे शालेय विद्यार्थ्यांचे नियमित शिक्षण बाधित होऊ नये, यासाठी शालेय शिक्षण विभागाने विविध उपाययोजना केल्या आहेत. कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होत असल्याच्या पार्श्वभूमीवर दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा प्रचलित पद्धतीने घेण्यात येत आहे. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इयत्ता दहावीच्या परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या बाबतीत इयत्ता सातवी व इयत्ता आठवीमध्ये विद्यार्थ्यांचा क्रीडा स्पर्धेतील सहभाग विचारात घेण्यात येऊन त्यांना सन २०२१-२२ या वर्षासाठी सवलतीचे क्रीडा गुण देण्यात यावेत. तसेच इयत्ता बारावी परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या बाबतीत इयत्ता नववी व दहावीमधील विद्यार्थ्यांचा क्रीडा स्पर्धेतील सहभाग विचारात घेऊन सन २०२१-२२ साठी सवलतीचे क्रीडा गुण देण्यात यावेत, असे निर्देश राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सचिवांना गायकवाड यांनी दिले आहेत.



### जिल्ह्यातील कुपोषित बालकांचा आकडा चिंताजनक

बीड : जिल्ह्यात कोरोना काळात मुलींचे जन्मदर घटल्याचा आकडासमोर आल्यानंतर आरोग्य प्रशासन खडबडून जागे झाले होते. ही घटना ताजीच असताना आता कुपोषणासारखे गंभीर संकट जिल्ह्याच्या डोक्यावर घोंगावत आहे. बीड जिल्ह्यात तब्बल २९४ कुपोषित बालकांची नोंद झाल्याची आकडेवारी समोर आली असूनकुपोषित बालकांवर जिल्ह्यातील विविध रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

## उध्दवबापूंची भेट एक सुरेल मैफल : आमदार देशमुख

प्रतिनिधी

अंबाजोगाई : येथे ख्यातनाम पखवाज वादक, दिवंगत पद्मश्री शंकरबापू आपेगावकर यांचे सुपूत्र व जगविख्यात पखवाज वादक पंडित उद्धवबापू आपेगावकर यांच्या 'मृदंग' या निवासस्थानी रविवारी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी सदिच्छा भेट दिली. ही भेट अक्षरशः एखाद्या स्वर मैफलीसारखी सुरेल ठरली, याचा आनंद मनात असल्याच्या भावना आमदार देशमुख यांनी व्यक्त केल्या.



आपेगावकर यांच्या घराच्या भिंतीच इतक्या बोलक्या होत्या की त्यातून आपोआप पद्मश्री शंकरबापू आपेगावकर यांच्या जीवनकार्याला उजाळा मिळत होता. खरंतर ही वास्तू मला स्मारकासमान वाटत होती. इतक्या आपल्या वडिलांच्या आठवणी उद्धवबापू आपेगावकर आणि त्यांच्या कुटुंबियांनी जतन करून ठेवल्या आहेत.

दिवंगत शंकरबापू आपेगावकर यांनी आयुष्यभर शास्त्रीय संगीताची निःस्वार्थपणे सेवा केली. त्यांच्या अनेक मैफलीला आदरणीय विलासराव देशमुख साहेब हे रसिक म्हणून उपस्थित राहत असायचे. मग ती मैफल लातूर-बीड मध्ये असो किंवा पुण्या-मुंबईत...

अशा अनेक आठवणींना यावेळी उजाळा मिळाला, अशाही भावना आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी व्यक्त केल्या आहेत. याप्रसंगी काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख आदींनी उपस्थिती होती.

## गेवराईत तहसीलदार सचिन खाडेंवर गुन्हे

प्रतिनिधी

बीड : घरातील कोणाचीही परवानगी न घेता घरात घुसून महिलांना धमकवल्या प्रकरणी गेवराई चे तहसीलदार सचिन खाडे यांच्यासह सात ते आठ अनोळखी व्यक्तींवर गेवराई पोलीस ठाण्यात वेगवेगळ्या तीन महिलांच्या फिर्यादीवरून गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दरम्यान, फिर्यादी महिला गेवराईच्या समृद्धी नगर भागातील रहिवासी असून त्यांच्या घरी विनापरवाना जाऊन तुम्ही वाळु प्रकरणातील आरोपी लपवून ठेवले आहेत असे म्हणत धमकवल्याचे या महिलांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. मात्र अगोदरच गेवराई मधील अवैध वाळु उपशाचा प्रश्न ऐरणीवर आलेला असतानाच आता वाळुचा वाद घरापर्यंत गेला असल्याचे दिसून येते. फिर्यादीत सांगितल्याप्रमाणे तहसीलदार सचिन खाडेंसोबत आणखी सहा ते सात लोक कोण होते ते पोलीस तपासात स्पष्ट होईल. तर या सर्व प्रकरणी आम्ही जिल्हाधिकारी यांना अहवाल सादर करणार असल्याचे सांगत महिलांवर अन्याय होत असेल तर त्याच्यावर कारवाई होणारच मग तो कोणीही असो अशी प्रतिक्रिया राज्य महिला आयोगाच्या सदस्या संगिता चव्हाण यांनी दिली आहे.

## उद्योगरत्न'ने सतिष सावंत सन्मानित



मुंबई : येथे सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते उद्योगरत्न पुरस्कार स्वीकारताना दि मराठवाडा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष सतिष सावंत.

## मल्हारी मार्तंड संस्थेतर्फे शैक्षणिक साहित्य वाटप

प्रतिनिधी

माजलगाव : रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मल्हारी मार्तंड संस्थेतर्फे जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष विशाल देवकते, गणेश काटकर, संपती कुंडकर, संदीपान राऊत, रामदास ताटे, शुभम राऊत, कारभारी गवळी, शरद कुंडकर, पप्पू गवते, एकनाथ दिवटे, राहुल कुंडकर, उध्दव कुंडकर, गणेश नेमट, सुरेश ताटे, आकाश वैद्य व मार्तंड बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे सर्व सदस्य उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. शाळेचे कैलास साखरे यांनी सर्वाचे स्वागत केले.




## 'पाटील साहेब प्रतिष्ठान'तर्फे शिवजयंती उत्साहात







प्रतिनिधी

माजलगाव : इतिहासाच्या पानावर.. रयतेच्या मनावर.. मातीच्या कणावर.. आणि विश्वासाच्या प्रमाणावर राज्य करणारा राजा म्हणजे राजा शिवछत्रपती. त्यांच्या शिवजन्मोत्सवानिमित्त 'पाटील साहेब प्रतिष्ठान'तर्फे वतीने सामाजिक बांधिलकी जपत दरवर्षीप्रमाणे याही वर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

१९ फेब्रुवारी रोजी शिवजयंतीनिमित्त शिवरायांच्या मुर्ती चे पूजन करून छत्रपती शिवाजी महाराज चौक माजलगाव या ठिकाणी रक्तदान शिबिर घेण्यात आले होते. या शिबिरात एकूण १२१ रक्तदात्यांनी रक्तदान करून छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी केली. या कार्यक्रमाचे आयोजन पाटील साहेब प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राम नरवडे, युवा सेना जिल्हाप्रमुख शुभम डाके, मयूर आमसुले, वैभव राऊत, दीपक जाधव, विश्वजीत होके, बाळराजे निंबाळकर, प्रतीक कापसे, कार्तिक फपाळ, बलराम मानधने, मुन्ना झोडगे, कमळे साहेब, अजय नरवडे, विशाल फपाळ, भगवान नवले व गणेश तौर यांच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी केशव साळुंके, अशोक मोरे, गोविंद लोखंडे, करण थोरात, संतोष धिरडे, केशव थोरात, लक्ष्मण मस्कर, पप्पू नरवडे व शितल मंडप माजलगाव आदींनी परिश्रम घेतले.

वर्तमान प्रतिबिंब

रहा ऑनलाईन कनेक्ट..

www.vartmannews.in

या वेबसाईटला भेट द्या !

संपादकीय

## उघडा डोळे, बघा नीट जाहिराती

सध्या स्पर्धेचे युग आहे. त्याहीपेक्षा डिजीटल युग आहे. त्यामुळे ऑनलाईन मार्केटिंगच्या भूलभुलैयात अडकून पडण्याअगोदर ग्राहकांनी सजग राहण्याची गरज आहे. हल्ली खरेदीच्या वेगवेगळ्या साईट्सवर आपल्याला उपयुक्त वाटेल, अशा वस्तूंच्या जाहिराती आपण बघतो. इतक्या आकर्षक की खरेदी करण्याची भूल न पडली तरच नवल. ॲमेझॉनवर २०१९ मध्ये एक काश्मिरी स्कार्फची जाहिरात होती. पण हे स्कार्फ अस्सल काश्मिरी नसून बनावट आहेत. त्यामुळे ॲमेझॉनने त्याची विक्री तत्काळ थांबवावी' असा आक्षेप एका काश्मिरी उद्योग संस्थेने त्यावर घेतला. त्यावर ॲमेझॉनने वचन दिले की, स्कार्फचा धागा याची योग्य माहिती दिल्याशिवाय त्याची विक्री करणार नाही. पण ॲमेझॉनने स्वतःचा शब्द न पाळता नुसती या वस्तूंची विक्री चालूच ठेवली नाही, तर त्याचे भौगोलिक क्षेत्र परदेशांपर्यंत वाढवले. त्यामुळे काश्मिरी अँड कॅमल हेअर मॅन्युफॅक्चरर्स इन्स्टिट्यूटने ॲमेझॉनवर नोव्हेंबर २०२१ मध्ये खटला भरला आणि त्यात नमूद केले की, ॲमेझॉनने इतरही काश्मिरी कपड्यांचे मार्केटिंग केले आहे. शिवाय हे कपडे अमेरिका आणि इतर देशांतही ॲमेझॉनच्या साइटवर विक्रीसाठी उपलब्ध आहेत. डिसेंबर २०२१ मध्ये सी.सी.एम.आय.ने अमेरिकेतील विक्रेत्यांना काश्मिरी उत्पादने विकण्यास मनाई करण्याचा ठराव मंजूर केला. पण असे असूनसुद्धा ॲमेझॉनविरुद्धचे हे दावे फेटाळले गेले. यात ॲमेझॉनची वस्तूंची जाहिरात करण्याची पद्धत, स्टार रेटिंग्स आणि फक्त एक विक्रेता म्हणून ॲमेझॉनची जबाबदारी या गोष्टींचा ऊहापोह न्यायालयात केला गेला, एवढेच या खटल्याचे फलित होय असे म्हणावे लागेल. दुसरे उदाहरण ॲमेझॉन कंपनीचेच पाहू. त्यांच्या मालकीच्या रिंग' या कंपनीच्या जीवनरक्षक' या उत्पादनाच्या जाहिरातीचे. हे उत्पादन म्हणजे औषध नसून लाइफ अलर्ट, बटण–ॲक्टिव्हेटेड मेडिकल अलर्ट सिस्टीम अशा प्रकारचे इलेक्ट्रॉनिक उपकरण आहे. अमेरिकेत २०२० मधील याच्या जाहिरातीत मी पडलो आणि मी उठू शकत नाही' ही टॅगलाइन वापरली होती. या उत्पादनामुळे आम्ही बऱ्याच जणांचा जीव वाचवला, अशी जाहिरातबाजी केली. पण प्रत्यक्षात किती जीव वाचवले याची आकडेवारी मात्र दिली नाही. रिंग'पेक्षा कितीतरी जुनी १८७४ मध्ये स्थापना झालेली एडीटी ही होम सिक्युरिटीमधील सर्वात जुनी कंपनी. अनुभव संपन्नतेमुळे ती इतर कोणत्याही उत्पादकांच्या पेक्षा अधिक सरस जीवनरक्षक उत्पादने बनवण्याची शक्यता आहे. पण त्यामुळे त्याची उत्पादने अधिक चांगली असतीलच असे मात्र नाही. म्हणूनच अशा प्रकारच्या फसव्या दाव्यांवर ग्राहकांनी लक्ष ठेवणे गरजेचे आहे. ऑक्टोबर २०२१ मध्ये अमेरिकेतील औद्योगिक गुन्ह्यांसाठी दंड आकारण्याचा अधिकार असलेल्या फेडरल ट्रेड कमिशनने अनेक उद्योगांना जाहिरातींच्या कायद्यातील काही महत्त्वाच्या मुद्द्यांबाबत कळवले आणि सांगितले की, त्यांनी या कायद्यांचे जाणीवपूर्वक उल्लंघन केल्यास मोठा आर्थिक दंड भरावा लागेल. यात काही एम.एल.एम. कंपन्याही होत्या. २०१२ मध्ये अमेरिकेत ट्रूथ इन ॲडव्हर्टीझिंग' ही संस्था स्थापन झाली. त्यांनी एम.एल.एम. कंपन्या व्यवसायाच्या संधी' या नावाखाली दिशाभूल करणारे आर्थिक दावे कसे करतात, याचे हजारो पुरावे गोळा केले. या संस्थेने फेडरल ट्रेड कमिशनला एकूण ६३८ एम.एल.एम. कंपन्यांची यादी सादर केली, ज्यांनी त्यांच्या भरती प्रक्रियेत अवास्तव आणि खोटे उत्पन्नाचे दावे केले होते. एफ.टी.सी.ने त्या सर्व कंपन्यांना नोटीस पाठवून कळवले की, त्यांनी फसवणूक करणारे आर्थिक दावे केल्यामुळे त्यांना प्रत्येक गुन्ह्यामागे ४३,७९२ डॉलरचा दंड भरावा लागेल. अमेरिकेतील एम.एल.एम. कंपन्यांनी याची दाखल न घेतल्यास २०२२ या वर्षात त्यांना फार मोठ्या आर्थिक दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल. डार्क पॅटर्न' नावाच्या ग्राहकांना फसवणाऱ्या योजनांविरुद्ध मोहीम उघडण्याचे ऑक्टोबर २०२१ मध्ये अमेरिकेतील एफ.टी.सी.ने जाहीर केले. या योजनांमध्ये ग्राहकांना सदस्यता घेण्यास उद्युक्त केले जाते व पुढे ती रद्द करायची असल्यास त्यांना वारंवार पैसे द्यावे लागत. यात ग्राहकाची लुबाडणूक होते. एक उदाहरण म्हणून ट्रूथ इन ॲडव्हर्टीझिंग या संस्थेने फेडरल ट्रेड कमिशनला अगोरा' नावाच्या एका कंपनीची जाहिरात सादर केली, ज्यात त्यांनी वयस्क लोकांना पोषणाची उणीव भरून काढणारे टॉनिक घेण्यास प्रवृत्त केले. हे उत्पादन थोड्याच काळासाठी उपलब्ध आहे आणि मर्यादित साठा आहे, असे सांगून खोटी निकड निर्माण केली. ग्राहकांकडून जास्त नफा मिळवण्यासाठी त्यांना हे उत्पादन लवकर घेण्यास भाग पाडले. अशा प्रकारच्या योजनांमुळे ग्राहक आपली स्वतंत्र विचारशक्ती हरवून बसतात व हेच घातक आहे. आधुनिक काळातील ग्राहकांसाठी अजून एक फसवी गोष्ट म्हणजे मेटाव्हर्स', म्हणजे आभासी विश्वात डिजिटल माध्यमातून आपण संपर्कात असणे. सर्व कंपन्या आपल्या उत्पन्नांच्या जाहिरातींचा भडीमार करून याचा फायदा उचलतात आणि लहानथोर या जाळ्यात अडकतात. उदाहरणार्थ, अमेरिकेतील रॉब्लॉक्स' नावाची कंपनी. याचे अर्धे ग्राहक १३ वर्षाखालील कुमार गटातील आहेत. ही कंपनी या मुलांना भुलवणाऱ्या आभासी विश्वातील गोष्टींचा उपयोग करते. तसेच नायकी, वॅन्स, हुंदाई या कंपन्यासुद्धा याच आभासी जगाचा उपयोग करून आपली जाहिरात करतात. आता मेटा' म्हणून ओळखले जाणारे फेसबुकही डिजिटल कपड्यांपासून ते डिजिटल घरांपर्यंत हर प्रकारच्या आभासी प्रतिमेच्या जाहिराती दाखवून कोट्यवधी डॉलरचा व्यवसाय करते. पण हे सर्व आभासी जग आहे, यात किती गुंतायचे हे ग्राहकांनी सजगपणे ठरवले पाहिजे. वरील सर्व उदाहरणे जरी अमेरिकेतील असली तरी भारतातील ग्राहकांनाही ती लागू पडतात. त्यामुळे अशा फसव्या जाळ्यात न अडकता ग्राहकांनी खरे काय ते ओळखून जागरूक राहिले पाहिजे. केवळ ॲमेझॉन नाही तर अनेक इतर शॉपिंग कंपन्या ऑनलाईन आमिषे दाखवतात. सर्व बाबींची खातरजमा न करता खरेदी केल्यास फसवणूक होवू शकते. त्यामुळे वेगवेगळी प्रलोभने दाखवणाऱ्या जाहिराती उघडा डोळे, बघा नीट असा संकेत देतात.

# गुजरातचा महाघोटाळा 'पॅटर्न'

**गुजरातच्या एबीजी या शिपयार्ड कंपनीनं तब्बल २३ बँकांना चुना लावत २३ हजार कोटींचा घोटाळा केलाय. भारताच्या बँकिंग इतिहासातला हा सगळ्यात मोठा घोटाळा आहे. नीरव मोदी, मेहुल चोक्सी अशा गुजरातच्या उद्योगपतींनी याआधीच बँकांना चुना लावून देशातून पळ काढलाय. त्यात एबीजी ग्रुपच्या ऋषी अग्रवाल यांची भर पडतेय. या घोटाळ्याची कुंडली मांडणाऱ्या ज्येष्ठ पत्रकार रवीश कुमार यांच्या फेसबुक पोस्टचं हे शब्दांकन.**

भारतातल्या बंदरांच्या विकासाचा मुद्दा नरेंद्र मोदींनी राजकारणाच्या केंद्रस्थानी ठेवलाय. वाराणसीमधे एक बंदर बांधलं गेलं. त्यातून नेमकी किती उलाढाल झाली हा भाग वेगळा. पण बंदर बांधलं गेलं तेव्हा विकासाचं नवीन शिखर म्हणून त्याचा डांगोरा पिटला गेला. सागरमाला या प्रोजेक्टमधून जुन्या बंदरांचा विकास आणि नवी बंदरं उभी केली जातायत. त्याअंतर्गत ६ लाख कोटींचे प्रोजेक्ट येत असल्याचा दावा सरकारनं केलाय. २०३५पर्यंत सरकारला हे प्रोजेक्ट पूर्ण करायचेत.

गुजरात बँक घोटाळ्याचं केंद्र

भारताच्या बँकिंग इतिहासातला सगळ्यात मोठा घोटाळा याच शिपिंग क्षेत्रात झालाय. तोही गुजरातमधे. त्यामुळेच या घोटाळ्याच्या खोलात जायला हवं. गुजरातमधल्या अदानी बंदरावर २० हजार कोटींचं ड्रग्ज सापडलं होतं. मीडिया या बातमीच्या खोलात गेलं नाही. आर्यन खानचं काही ग्रॅमचं ड्रग्ज प्रकरण मात्र दिवसरात्र टीवीवर चालवलं गेलं. २० हजार कोटींच्या ड्रग्जवरून लोकांचं लक्ष हटवण्यासाठी सगळे रिपोर्टर आर्यन खानमागे लावले गेले. नरेंद्र मोदींच्या काळात हे सगळं चाललंय. एबीजी ही सुरतमधली एक शिपयार्ड कंपनी आहे. या कंपनीने २३ बँकांची फसवणूक करून २२ हजार ८४७ कोटींचा बँक घोटाळा केला. कंपनीने बनावट आकडे दाखवून बँकांकडून कर्ज घेतलं. एक कंपनी तब्बल २३ बँकांना चुना लावतेय याचा कुणालाही थांगपत्ता लागला नाही हे विशेष! मोठ्या कंपन्यांना कर्ज देताना बँका कशा डोळेझाक करतात हे यातून स्पष्ट होतं. दुसरीकडे सर्वसामान्य माणसांनी कर्ज घेतलं तर त्यांच्या किती काय चौकशा होतात. पण एक कंपनी २३ बँकांकडून २३ हजार कोटींचं कर्ज घेते. पैसा घेऊन पळूनही जाते. ही गोष्ट कळायला महिनोंमहिने जातात. तपास करून एफआयआर दाखल करण्यासाठी दोन वर्ष लागतात. नोव्हेंबर २०१९ला या २३ बँकांच्या ग्रुपनं पहिली




तक्रार सीबीआयकडे केली तेव्हा हा घोटाळा उघड झाला.

नरेंद्र मोदींच्या दाव्यांची पोलखोल

एसबीआय बँकेनं एक प्रसिद्धीपत्रक जाहीर केलंय. ते अजूनच शंका वाढवणारं आहे. एसबीआयनं लिहिलंय की, यातले जास्तीचे पैसे हे आयसीआयसीआय आणि आयडीबीआय बँकेचे आहेत. पण तक्रार एसबीआयनं केलीय. पण केवळ आपलाच पैसा बुडला नाहीय तर आयसीआयसीआय आणि आयडीबीआयचाही बुडलाय हे सांगण्यासाठीच एसबीआयनं ही माहिती सार्वजनिक केली असेल का? एसबीआयनं फार हुशारीने हे प्रसिद्धीपत्रक तयार केलंय. बँकेनं हे सांगायला हवंय की त्यांचा नेमका किती–किती पैसा यात बुडालाय. प्रसिद्धीपत्रकातून कळतंय की, २०१३ पासूनच २३ बँकांना कळत होतं की ही कंपनी बुडतेय. कंपनीचा कारभार चांगला चालत नाहीय. हे सगळं माहिती असतानाही कर्ज दिलं गेलं. शिपिंग क्षेत्रातल्या मंदीमुळे कंपनीचा व्यवसाय उभा राहिलाच नाही असं एसबीआयचं म्हणणंय. बँकेचं हे म्हणणं आश्चर्यकारक आहे. एसबीआयनं दिलेलं उत्तर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या या क्षेत्रातल्या प्रयत्नांची पोलखोल करणारं आहे. बंदरांवर विशेष लक्ष देण्याच्या नावाखाली सरकार स्वतःचीच प्रतिमा तयार करण्यावर भर देतंय. वाराणसीमधेही इथं तिथं बंदरं बांधली जातायत. शिपिंग क्षेत्राच्या विस्तारासाठी सरकार प्रयत्न करत असल्याचा एकीकडे भास निर्माण केला जातोय. तर दुसरीकडे याच क्षेत्रातली एक कंपनी भारताच्या बँकिंग इतिहासातला

**आज-काल**

**रवीश कुमार**

सगळ्यात मोठा घोटाळा करतेय. त्यामुळे एसबीआयच्या उत्तराने मोदींचे दावे खोडून काढलेत. कंपनीच्या घोटाळ्याबद्दलचा इशारा मोदी सरकारला २०१८ला दिल्याचं काँग्रेसचे प्रवक्ते रणदीप सुरजेवाला यांनी म्हटलंय. तसं असेल तर ही गोष्ट फारच गंभीर आहे.२०१९ला बँकांनी पहिल्यांदा सीबीआयला या फसवणूकची माहिती दिली. त्यावर कारवाई करायला सरकारला ५ वर्ष लागल्याचा आरोप काँग्रेसनं केलाय. २००७ला नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री असताना एबीजी कंपनीला १ लाख २१ हजार चौरस मीटर इतकी जमीन देण्यात आली होती.

गंडा घालणारे गुजराती उद्योगपती

२३ बँकांना तब्बल २३ हजार कोटींचा गंडा घालणारे एबीजी ग्रुपचे ऋषी अग्रवाल परदेशात राहून किती ऐशोआरामात आयुष्य जगत असतील? थोडं खाल्लं असेल थोडं खायला दिलं असेल. त्यांच्या दरबारात हजेरी लावून कित्येक राजकीय पक्षाच्या नेत्यांनी मजामस्ती केली असेल. कुणीही परदेशात पळून गेलं नसल्याचं सरकार म्हणतंय. मग ऋषी अग्रवाल आणि इतर आरोपींना अटक होईल? नीरव मोदी आजपर्यंत सापडलेला नाही. तो १४ हजार कोटींना चुना लावून पळून गेला. बँकांनी ही फसवणूक कशी सहन केली असेल? मेहुल चोक्सीही सापडला नाही. बडोद्याचा चेतन आणि नितीन संदेसरा कुटुंबासोबत भारतातून पळून गेले. खोटे हिशोब दाखवून त्यांनी बँकांकडून कर्ज घेतलं आणि त्यातले १६ हजार कोटी देशाबाहेर उडवले. ईडीने त्यांची १४ हजार कोटींपेक्षा अधिक प्रॉपर्टी जप्त केलीय. या प्रकरणात अनेक लोक तुरुंगात आहेत.

हजारो कोटींचे घोटाळे

द हिंदूच्या देवेश पांडे यांचा एक रिपोर्ट आहे. त्यांच्या रिपोर्टनुसार, २०२०ला सीबीआयने बँक फसवणुकीचे १९० गुन्हे दाखल केलेत. एकूण ९०० प्रकरणांमधे ६० हजार कोटींचे घोटाळे झालेत. १ हजार कोटींहुन अधिकच फसवणूक झालीय असे एक डझनहून अधिक घोटाळे आहेत. वेगवेगळ्या राज्यांमधे ते नोंदवले गेलेत. हैद्राबादच्या एका कंपनीनं ७ हजार ९२६ कोटींचा घोटाळा करून तो पैसा परदेशात पाठवला. हैद्राबादच्याच वीआरसीएल लिमिटेड या कंपनीनं ४ हजार ८३७ कोटींचा घोटाळा केलाय. २०२१मधे ३० हजार कोटींचे घोटाळे झालेत. आधीच्या तुलनेत कमी असले तरी २०२०–२१मधे भारतात २२९ बँक फसवणुकीची प्रकरणं नोंदवली गेली. आरबीआयच्या आकडेवारीनुसार, त्यातल्या एक टक्क्यांपेक्षाही कमी प्रकरणांमधे वसुली झालीय. त्यामुळे पैसा घेऊन जे पळून गेले ते गेलेच. २८ डिसेंबर २०२१ची बिजनेस स्टँडर्डची एक बातमी आहे. आरबीआयच्या रिपोर्टनुसार, २०२१–२२मधे भारतात बँक फसवणुकीची ४ हजार ७१ प्रकरणं नोंदवली गेली. त्याआधी ३ हजार ४९९ प्रकरणं समोर आली. एप्रिल ते सप्टेंबर २०२१मधे ३६ हजार ३४२ कोटींची फसवणूक झालीय. तर २०२०–२१मधे ६४ हजार २६१ कोटींची फसवणूक झाली.

मोदींनी गृहराज्याकडेही पहावं

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कार्यकाळात त्यांच्याच गुजरात राज्यातून ५३ हजार कोटींचा घोटाळा समोर आल्याची बातमी आहे. भारताच्या इतर राज्यांमधून अनेक बँक घोटाळे समोर आलेत. पण गुजरातमधल्या घोटाळ्यांचा राजकारणाशी संबंध आहे की काय अशी शंका येतेय. हजारो कोटींचा घोटाळा करणाऱ्याचे राजकीय संबंध नसतील, त्यांना पैसे दिले नसतील यावर विश्वास ठेवणं कठीण आहे. सहा कोटी गुजरातींच्या अस्मितेचं राजकारण करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपल्या राज्याची काळजी करावी. या घोटाळे बहाद्दरांचा सन्मानही याच जमिनीवर करायला हवा. हिंदी पट्ट्यातल्या खंडणीच्या उद्योगाप्रमाणे इथं फसवणुकीचा उद्योग सुरू आहे. त्यातून बँकांना हजारो कोटींचा गंडा घातला जातोय.

(शब्दांकन – अक्षय शारदा शरद)

# वह सुबह कभी तो आयेगी!

**नुकत्याच पार पडलेल्या प्रजासत्ताक दिनाला राष्ट्रपतींनी देशातल्या सध्याच्या परिस्थितीवर बोलताना सरकारचं भरभरून कौतुक केलं. त्यांच्या याच भाषणाचा आधार घेत ३ फेब्रुवारीला तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा यांनी आपल्या भाषणातून सरकारवर जोरदार टीका केली. त्या भाषणाची अनंत घोटगाळकर यांनी केलेली अनुवाद प्रसिद्ध करत आहोत.**

ते तीन शेतीविषयक कायदे आणू नका असं ते तुम्हाला सतत सांगत होते. मला वाटतं ते कायदे तुम्ही मागे घेतलेत तेही पश्चिम उत्तरप्रदेशातल्या सत्तर जागा गमावण्याच्या भीतीपोटी. ७००हून जास्त शेतकऱ्यांचे बळी गेल्याचा तुम्हाला काही पश्चात्ताप झाला म्हणून नाही. आजही पिकांना किमान आधारभूत किंमत देण्याच्या शेतकऱ्यांच्या प्रमुख मागणीवर तुम्ही कोणतीच लेखी हमी दिली नाहीय. तुमचा जाटांवर विश्वास नाही. शिखांवर विश्वास नाही. जो कोणी ठामपणे तुमच्यापुढे उभा ठाकतो त्या कुणावरच तुमचा विश्वास नाही. तरी निवडणूक जवळ आली की मात्र निलाजरेपणाने पगडी डोक्यावर चढवून तुम्ही आघाडीसाठी हात पुढं करता. पण या वेळी चौधरी मंडळी मागचं विसरणार नाहीत.

लखीमपुर–खेरी प्रकरणावर टीका

या सरकारच्या विद्यमान मंत्र्याच्या मुलानं पाच शेतकऱ्यांवर गाडी घालून त्यांना ठार मारलं आणि त्याला अटक करायला या सरकारने तब्बल तीन दिवस घेतले. शेवटी अटक केली तीही या क्रौर्यामुळे हादरून गेलेल्या सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप केला म्हणून. ही गोष्ट चौधरी विसरणार नाहीत. खेरी मधून लोकसभेवर निवडून आलेल्या त्या राज्यमंत्र्याची पदावरून हकालपट्टी करा अशी मागणी मी या व्यासपीठावरून करतेय. ते या पदाला चिकटून असलेला प्रत्येक मिनिट म्हणजे फक्त लोकशाहीचाच नाही तर आपल्या राजकीय जीवनातल्या सुसंस्कृततेचा, नैतिकतेचा आणि आत्मसन्मानाचाच घोर अपमान आहे. खरं तर इथं उभं राहून मला हे सांगावं लागू नये. तुमच्या विवेकबुद्धीनेच तुम्हाला हे सांगायला हवं होतं. पण म्हणतात ना, जब नाश मनुज पर छाता है तो पहले विवेक मर जाता है।

पेगॅससचा राडा

आपल्या प्रजासत्ताकाचे अधिपती वर्तमानाबद्दल किती अविश्वास बाळगतात याच ज्वलंत उदाहरण म्हणजे पेगॅससचा राडा. होय. बोलणार मी या विषयावर. आज जे सत्तारूढ बाकांवर बसलेत त्यांनीच तर एक अख्खं सरकारच्या सरकार २जी प्रश्नावरून खाली खेचलं



आणि हा २जी प्रश्नही त्यावेळी न्यायासनासमोर होता. तेव्हा हा प्रश्न न्यायप्रविष्ट असल्याचं तुणतुणं माझ्यासमोर वाजवू नका. बोलणार मी या विषयावर. करदात्यांचा पैसा आपल्याच नागरिकांवर हेरगिरी करण्यासाठी खास तंत्रज्ञान विकत घ्यायला वापरल्याचा आरोप या सरकारवर करण्यात आलाय. एका आघाडीच्या पत्रकाराच्या शब्दात सांगायचं तर न्यूयॉर्क टाईम्स' खोटं बोलतंय, द वायर' खोटं बोलतंय, म्नेस्टी इंटरनॅशनल' खोटं बोलतंय, फ्रेंच, जर्मन आणि अमेरिकन सरकार खोटं बोलतंय, एनएसओवर खटला भरणारे व्हाट्सप आणि पल खोटं बोलतायत.

सोयीचे कायदे बनवणारं सरकार

एक आपलं हे सरकार तेवढंच काय ते पेगॅससच्या बाबतीत सत्यनिष्ठेचा मनोरम पण एकाकी प्रत्यय देतंय. एक मंत्री या लोकांना सुपारी मीडिया' म्हणतोय आणि दुसरा इथं उभा राहून निर्लज्जपणे आम्हाला सांगतोय. कायद्यातल्या खासगीपणाचं उल्लंघन न करण्याच्या प्रत्येक तरतुदीतून स्वतःला मात्र सूट देणाऱ्या डेटा संरक्षण विधेयकाचं हे सरकार कसं काय समर्थन करू शकतं? भारत हे घटकराज्यांनी मिळून बनलेलं संघराज्य आहे. भारताच्या सध्याच्या संघराज्यात्मक संरचनेबद्दल तुमच्या मनात मुळीच आदर नाही. एरवी राज्याच्या भूमीत देशाच्या सीमेपासून ५० किलोमीटर आतपर्यंत सीमा सुरक्षा दलाचे अधिकारक्षेत्र विस्तारण्याच्या तद्दन बेकायदेशीर निर्णयाचं तुम्ही कसं काय समर्थन करू शकला असता?

**आज-काल**

**महुआ मोईत्रा**

इतर धर्मावरचा अविश्वास

सिद्दीकी कप्पन या पत्रकारावरचा तुमचा अविश्वास तर या टोकाचा आहे की तो हाथरसला पोचलेलाही नसताना आणि आपलं वार्तापत्र त्यानं अजून लिहिलेलंही नसताना तुम्ही त्याला सरळ अटक करून टाकता. मुन्वर फारुकी या विनोदवीराने न केलेल्या विनोदाबद्दलही तुम्ही असाच अविश्वास दाखवता.

राष्ट्रपतींच्या भाषणात म्हटलंय की तिहेरी तलाक पद्धत रद्द करून, हज यात्रेवरील बंधन हटवून मुस्लिम स्त्रियांच्या बंधमुक्तीची सुरवात या सरकारने केलीय. तरी देशातल्या मुस्लिम महिलांना २०२२च्या पहिल्याच दिवशी बुलीबाई ॲपवर आपला लिलाव होत असल्याचं वास्तव पहावं लागलं. २०२१च्या सुली डील्स या पचीच ही दुसरी आवृत्ती होती. तीव्र प्रतिक्रियांचे तडाखे बसल्यावर मग कुठे सरकारला जाग आली आणि काही लोकांना अटक केली गेली. आज मुसलमानांना घर भाड्यानं दिलं जात नाही. भारतात कोविड त्यांनीच पसरवला असले आरोप त्यांच्यावर केले जातात. त्यांच्यावर आर्थिक बहिष्कार टाकला जातो आणि प्रशासनानेच आखून दिलेल्या जागी नमाज पढायला त्यांना मनाई केली जाते. या सरकारनं सुरु केलेल्या ऐंशी विरुद्ध वीस टक्क्यांच्या लढाईमुळं आपल्या पवित्र प्रजासत्ताकाचाच १०० टक्के नाश होऊ शकण्याचा धोका आज निर्माण झालाय. युनायटेड ख्रिश्चन फोरम'च्या म्हणण्याप्रमाणे केवळ २०२१मधे देशात ख्रिश्चनांवर ४६० हल्ले झालेत. हिंसक जमावांनी १६ गावांमधे चर्च, ख्रिश्चन समुदाय आणि समारंभांवर हल्ले केलेत. करीमपूर नादिया या गावातल्या माझ्या घरात मोनीरूल शेख नावाच्या वृद्धाने गेल्या वर्षी मला जे सांगितलं ते इथं सांगताना शरमेनं आणि भयानं माझं मन व्याकुळ झालंय. तो म्हणाला होता, मा, एता तोमदेर नीतीर लोडाई आमदेर बचेर लोडाई.' मा, तुमच्या दृष्टीने ही एक वैचारिक लढाई आहे. आमच्या दृष्टीने मात्र हे जीवनमरणाचे युद्ध आहे.'

ही आपली लढाई

पण आज भारतीय म्हणून एक गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे. आपल्याला हे प्रजासत्ताक टिकवायचं असेल तर जबाबदारी आपलीच आहे. जे जे वकील, अभिनेते, व्यावसायिक देशात बदल झाला पाहिजे असं म्हणतात त्या सगळ्यांना, आपणा सर्वांना मी सांगू इच्छिते. लढाईची वेळ आपण निवडू शकत नाही. रणशिंग फुंकलं गेलंय. आज या क्षणी आपल्या प्रजासत्ताकाच्या सगळ्या नागरिकांनी संघर्ष करण्याची वेळ आलीय. यह सुबह हमीं से आयेगी। माझा सांसदीय विशेषाधिकार वापरून मी न्यायव्यवस्थेला सांगते. तुम्हीच या देशाचा शेवटचा तरणोपाय आहात. तुम्हीच यातून मार्ग काढू शकता. आमची निराशा करू नका. कृतीशील हस्तक्षेप करा. यह सुबह हमीं से आयेगी।

अर्थ: नको येऊस भय दावीत, राजांच्या अधिराजासारखा ये दयार्द्र आणि कल्याणप्रद , पंखात व्याधिहारी स्पर्श घेऊन प्रत्येकाच्या वेदनांसाठी तुजकडे आसवे असोत, प्रत्येकाचा पुकारा हृदयाला भिडो तुझ्या ये पापी जनांच्या सुहृदा, असा मजसमीप वास कर.

समाप्त

# परळीत उभारणार भव्य शिवमय प्रवेशद्वार

## शिवजन्मोत्सव सोहळ्यात पालकमंत्री धनंजय मुंडे यांची घोषणा

प्रतिनिधी

परळी : संपूर्ण हिंदुस्थानचे आराध्य दैवत, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयंती उत्सव ही तमाम शिवप्रेमींसाठी एक पर्वणीच आहे. परळीत छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या भोवती शिवजयंतीच्या निमित्ताने ज्याप्रमाणे सुशोभीकरण करून गड-किल्ल्यांच्या प्रवेशद्वाराची प्रतिकृती साकारली आहे, तशाच स्वरूपाचे प्रवेशद्वार याठिकाणी उभे करून चौक व परिसराचे सुशोभीकरण करण्याचा निर्धार पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी परळी येथील शिवजयंती कार्यक्रमात बोलताना व्यक्त केला आहे.



मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते भगवा ध्वज फडकावून व छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यास हार अर्पण करून 'जय जिजाऊ, जय शिवराय' च्या जयघोषात परळी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात नाथ प्रतिष्ठाणच्या वतीने शिवजयंती साजरी करण्यात आली.

यावेळी छत्रपतींच्या तेजमुर्तीस वंदन करून, प्रजाहितदक्ष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त उपस्थित शिवप्रेमींना मंत्री मुंडेंनी शुभेच्छा दिल्या. या मातीतील सामान्य माणसाच्या आर्थिक उन्नतीचे स्वप्न मी पाहिले आहे. येत्या काळात ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी मला बळ द्या, असे साकडे मंत्री मुंडे यांनी यावेळी छत्रपती शिवाजी महाराज व आई जगदंबेकडे घातले.

यावेळी जिल्हा परिषद गटनेते अजय मुंडे, नगर परिषदेचे गटनेते वाल्मिक कराड, राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, माणिक फड, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष लक्ष्मण पौळ, पंचायत समिती सभापती पिंटू मुंडे, युवा नेते अभय मुंडे, शंकर कापसे, सुरेश नानवटे, अमित केंद्रे, अमर रोडे, सुरज पाटील, बाबुशा कदम, ॲड.मनजीत सुग्रे, गोविंद कराड, संदीप दिवटे, गणेश सुरवसे यांसह मान्यवर उपस्थित होते.



# सादोळ्यात शिवजयंतीनिमित्त विविध स्पर्धांना प्रतिसाद

प्रतिनिधी

माजलगाव : सादोळा येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये शिवजयंती अतिशय उत्साहात साजरी करण्यात आली. शिवजयंतीच्या निमित्ताने शाळेने प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा,भाषण स्पर्धा, शिवचरित्रावर सामान्य ज्ञान स्पर्धा आदी विविध स्पर्धा घेण्यात आल्या. या सर्व स्पर्धामध्ये विद्यार्थ्यांनी अतिशय उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. शाळा सुरू झाल्यानंतर मुलांमध्ये नवचैतन्य व उत्साह दिसला. या सर्व स्पर्धामधील विजेत्यांना शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शरद शिंदे यांच्यातर्फे बक्षीस प्रायोजित करण्यात आले.

# खोलेश्वर परिवाराचे रक्तदानातून शिवरायांना अभिवादन

## तब्बल १४७ जणांनी केले रक्तदान; दिंद्रुड पंचक्रोशीतील आदर्श उपक्रम

प्रतिनिधी

दिंद्रुड : रक्ताचा तुटवडा भरून निघण्यासाठी खारीचा वाटा उचलत सलग दुसऱ्या शिवजन्मोत्सवाचा सण रक्तदान करून साजरा करण्याचा संकल्प दिंद्रुड येथील खोलेश्वर परिवाराने पूर्ण केला या रक्तदान शिबिरात १४७ दात्यांनी रक्तदान करून शिवरायांना अनोखे अभिवादन केले. या आदर्श उपक्रमाचे दिंद्रुड परिसरातून कौतुक होत आहे.



खोलेश्वर परिवाराचे सर्वेसर्वा दिलीप पारेकर यांच्या संकल्पनेतून शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन शनिवारी करण्यात आले होते. याप्रसंगी स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रक्तपेढी अंबाजोगाई रुग्णालयाचे रक्तसंकलन अधिकारी डॉ.रवि गुंडरे, डॉ.सुमित काळे, शशिकांत पाखरे, रमेश तोगरे, शेख बाबा, वाल्मिक कांबळे, अशोक परळकर घेतले. वर्षीही यांनी १४७ तरूण-तरूणींचे रक्तदान करवून घेतले. रक्तदान शिबिरात दिंद्रुड व पंचक्रोशीतील शिवभक्तांनी सहभाग घेतला, खोलेश्वरचे अध्यक्ष दिलीप पारेकर, उपाध्यक्ष प्रकाश कुलकर्णी, संचालक प्रताप शेंडगे, मुख्य कार्यकारी अधिकारी विलास पारेकर, प्रमोद गौंडर, भागवत साबळे यांच्यासह सर्व कर्मचारी व शिवप्रेमींनी शिबिरासाठी परिश्रम घेतले.

# माजलगावात छत्रपतींना ३९२ तोफांची सलामी

## रोहितभैय्या देशमुख मित्र मंडळाचा उपक्रम

प्रतिनिधी

माजलगाव : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९२ वी जयंती शिवछत्रपती मित्रमंडळ व रोहितभैय्या देशमुख युवा मंचाच्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी ऐतिहासिक देखावे साजरे करून भव्य मिरवणूकही काढण्यात आली होती.



माजलगाव शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती उत्सवाचे आयोजन रोहितभैय्या देशमुख युवा मंच व शिवछत्रपती मित्रमंडळाच्या वतीने करण्यात आले. जयंती समारोहाचे उदघाटन माजलगावचे माजी आमदार आर.टी.देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी डिसीसी बँकेचे माजी अध्यक्ष गोरख धुमाळ, रोहित देशमुख, जयंती उत्सवाचे मुख्य आयोजक भाजप युवा नेते सचिन कराळे, माजलगाव भाजप शहराध्यक्ष ॲड.माणिक दळवे, भाजप शहर उपाध्यक्ष बाळासाहेब क्षिरसागर, गोपाळ पैंजणे, वडवणीच्या सेवा सहकारी सोसायटी संचालक गोविंद मस्के, भाजप नेते शिवाजी तौर, भाजप विध्यार्थी आघाडीचे शहराध्यक्ष विजय रांजवण यांची प्रमुख उपस्थिती होती.

जयंती समारोहाच्या आयोजकांच्या वतीने वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते तसेच मिरवणुकीत घोड्यावर हातात भगवा झेंडा घेतलेल्या मावळ्यांच्या देखाव्याने वातावरण शिवमय झाले होते.

३९२ व्या जयंती निमित्त महाराजांना ३९२ तोफांची सलामीही देण्यात आली. वेशभूषा स्पर्धेचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.जयंती उत्सवात सहभागी होणाऱ्या प्रत्येकांना भगवा फेटा परिधान करण्यात आला होता तसेच मिरवणुकीत रथावरील शिवरायांच्या प्रतिमेने शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले होते.

भाजपा नेते तथा माजी आमदार आर.टी.देशमुख यांनी मनोगत व्यक्त करताना शिवरायांच्या स्वप्नातील समाज घडवणे ही आपली प्रत्येकाची जबाबदारी असून शिवरायांचे विचार आचरणात आणणे हेच महाराजांना खरे अभिवादन ठरेल, सचिन कराळे यांनी आज शहरात जो आगळा वेगळा शिवजयंतीचा उत्सव घेतला तो अखंड चालावा त्यात सातत्य रहावे अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. या वेळी ढोल ताशांच्या गजरात शिवरायांची मिरवणूक शहरात शिवप्रेमींच्या उत्स्फूर्त सहभागात झाली.

# बालसंस्कारातुनच शिवराय घडले

## रामानंद लड्डा यांचे प्रतिपादन; राजस्थानी विद्यालयात शिवजन्मोत्सव सोहळा

प्रतिनिधी

माजलगाव : येथील राजस्थानी माध्यमिक विद्यालय माजलगाव येथे शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.



सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज प्रतिमेचे पूजन संस्था सचिव रामानंद लड्डा, उपाध्यक्ष जे.सी.झंवर, कोषाध्यक्ष रमेशचंद्र कासट, मुख्याध्यापक चंद्रशेखर तौर यांनी केले. दरम्यान, बालसंस्कारातुनच शिवराय घडले, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार रामानंद लड्डा यांनी केले.वरील दर्शवलेल्या मान्यवरांच्या उपस्थीतीत विद्यार्थी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. सहभागी विद्यार्थी यांनी राजे शिवछत्रपती यांच्या विविध कार्याची मांडणी आपल्या विचारातुन व पोवाड्यातुन केली. सचिव रामानंद लड्डा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. बालवयात वाचन, श्रवण, संयम महत्वाचे ठरते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वाचन वाढवावे, बौध्दिक कथा श्रवन करावी असे आवाहन केले. स्पर्धेत सहभागी झालेल्या विध्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले. आणि उपस्थितांना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक चंद्रशेखर तौर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आदर्श राज्यकारभार विद्यार्थ्यांना अवगत केला व शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास सर्व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागतगीत कु.प्रतिक्षा आवाड, सूत्रसंचालन शिक्षक पांडुरंग होके आणि संजय बोबडे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

# सागर खुर्पे यांना मातृशोक

प्रतिनिधी

माजलगाव : येथील रघुप्रयाग उद्योग समुहाचे सर्वेसर्वा सागर खुर्पे



यांच्या मातोश्री जयश्री सिध्दलिंग खुर्पे (वय ६०) यांचे सोमवार, दि.२१ फेब्रुवारी रोजी सकाळी ९:१० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर वीरशैव रूद्रभूमीत सोमवारी दुपारी २ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुली, मुले, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. खुर्पे परिवारावर कोसळलेल्या दुःखात वर्तमान माध्यम समूह सहभागी आहे.



# राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहराध्यक्षपदी पटेल

प्रतिनिधी

माजलगाव : माजी नगरसेवक खलील पटेल यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. रविवारी सकाळी आमदार प्रकाश सोळंके यांच्या हस्ते जिल्हाध्यक्ष बजरंग सोनवणे यांच्या आदेशाने या निवडीचे पत्र खलील पटेल यांना देण्यात आले.

यावेळी मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक बांधकाम सभापती जयसिंग सोळंके, तालुकाध्यक्ष रमेश सोळंके, सभापती संभाजी शेजुळ, उपसभापती डॉ.वसिम मनसबदार, नासेर खॉ पठाण, विश्वंभर थावरे, नवाब पटेल, अच्युत लाटे यांची उपस्थिती होती.

माजी नगराध्यक्ष शेख मंजूर यांनी गत महिन्याभरापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहराध्यक्ष पदाचा राजीनामा दिला होता. येत्या नगरपरिषद निवडणुकीच्या दृष्टिकोनातून खलील पटेल यांच्या रूपाने राष्ट्रवादी काँग्रेसने ही जागा भरून काढली आहे. दरम्यान, खलील पटेल यांच्या निवडीने त्यांच्या समर्थकांनी शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, ईदगाह कॉर्नर या ठिकाणी फटाके फोडून आनंद व्यक्त केला.

# बीडच्या शिवजयंतीने डोळ्याचे पारणे फेडले

## आमदार संदीप क्षीरसागर यांचा पुढाकार;लेझर शोमुळे शिवजयंती ठरली लक्षवेधी

प्रतिनिधी

बीड : रयतेचे राजे, तमाम भारतीयांची



अस्मिता छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती बीड शहरात अभूतपूर्व वातावरणात साजरी करण्यात आली. आमदार संदीप क्षीरसागर यांच्या पुढाकारातून अत्याधुनिक लेझर शोमुळे अक्षरशः बीडकरांच्या डोळ्याचे पारणे फिटले. हजारो शिवभक्तांच्या साक्षीने बीड शहर शिवमय झाले होते.



### जिजाऊंच्या लेकींचा सहभाग

सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या या शिवजयंतीला महिला भगिनींची उपस्थिती लक्षणीय असते. मागील काही वर्षापासून ही शिवजयंती पाहण्यासाठी महिला भगिनी घराच्या बाहेर पडू लागले आहेत. आज झालेल्या या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांना देखील बीड शहरातील व परिसरातील हजारो महिलांनी आपली उपस्थिती नोंदवली होती.

१९ फेब्रुवारी रोजी रात्री बारा वाजता बीड शहरामध्ये अक्षरशः दिवाळी साजरी करण्यात आली. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त आमदार संदीप क्षीरसागर यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्या भोवती आकर्षक विद्युत रोषणाई बरोबरच लेझर शोच्या माध्यमातून सजावट करण्यात आली होती. सदरील लेझर शोच्या माध्यमातून करण्यात आलेल्या सजावटीमुळे जे विहंगम दृश्य दृष्टीस पडले. ते दृश्य डोळ्यात साठवून ठेवण्यासाठी रात्री बारा वाजता हजारो शिवप्रेमी महाराजांच्या पुतळ्याजवळ एकत्रित आले होते. याच ठिकाणी सर्वांनी फटाक्यांची आतिषबाजी करत महाराजांचा जन्मोत्सव साजरा केला. तर सायंकाळी साडेसहा वाजता जे कधीही अनुभवले नव्हते अशीच चित्तथरारक बाईक स्टंट बीडच्या हजारो जनतेने अनुभवले. तसेच डोळ्यांचे पारणे फिटावे असे लेझर शोच्या माध्यमातून दाखवण्यात आलेल्या चित्र पेटीतून छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास महाराष्ट्रात पहिल्यांदाच बीड शहरामध्ये दाखवण्यात आला.

यावेळी माजी आमदार अमरसिंह पंडित, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष अशोक डक, माजी आमदार सय्यद सलिम, माजी आमदार सुनिल धांडे, माजी आमदार सिराज देशमुख, माजी आमदार जनार्दन तुपे, ज्येष्ठ नेते डी.बी.बागल व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी सर्व उपस्थितांचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी आभार मानले. यावेळी मागील १७ वर्षापासून आमदार संदीप क्षीरसागर यांच्या माध्यमातून सार्वजनिक शिवजयंतीचे आयोजन केले जाते. प्रतिवर्षी काहीतरी नवे संस्कृतिक कार्यक्रम बीड शहरातील जनतेला पाहायला मिळावेत याच नितळ भावनेतून भारताच्या कानाकोपऱ्यातून येणारे कलावंत बीड शहरातील जनतेला त्यांच्या राज्यातील सांस्कृतिक कार्यक्रम दाखवत असतात. यावर्षीचे सांस्कृतिक कार्यक्रम हे काही वेगळे व तितकेच खास होते.

# वसंतराव काळे महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात

प्रतिनिधी

बीड : येथील दिवंगत अण्णासाहेब पाटील सेवाभावी संस्थेच्या वसंतराव काळे व संभाजी राजे महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे अधिकारी प्रा.वैजनाथ शिंदे उपस्थितांचे स्वागत यांनी केले. या कार्यक्रमाला संस्था अध्यक्ष रमेश पोकळे, प्रा.राजेश भुसारी, ॲड.मंगेश पोकळे, गोरख शिंदे, किशोर पिंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाला प्राचार्य गणेश पोकळे, प्रशासकीय अधिकारी संतोष सावंत, विनोद कोल्हे, प्रा.सुरेश कसबे, प्रा.सुहास गाढवे, प्रा.रूपम मुसळे, शरद पोकळे, सचिन चौरे, महेश नेवडे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.



# औषधनिर्माण क्षेत्रात अमाप संधी : डॉ.आनंदगावकर

## गुरूकृपा फार्मसी महाविद्यालयात युवा संमेलन





▶ प्रतिनिधी

माजलगाव : औषधी उत्पादन क्षेत्रात विद्यार्थ्यांसाठी खूप मोठे भविष्य आहे. या क्षेत्रात औषधाचे संशोधन करून शास्त्रज्ञ होऊन नवनवीन औषधी निर्माण कराव्यात. विद्यार्थ्यांनी उपजीविकेसाठी किंवा नौकरी पुरते शिक्षण न घेता आपले भविष्य उज्ज्वल करावे. आपले शिक्षण हे देशाला महासत्ता बनविण्यासाठी उपयोगी आणावे, असे मत डॉ.प्रकाश आनंदगावकर यांनी आयोजित गुरूकृपा फार्मसी महाविद्यालयातील युवा संमेलन बक्षीस वितरणाप्रसंगी व्यक्त केले.

माजलगाव तालुक्यातील मालीपारगाव येथील गुरूकृपा इन्स्टिटट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयात युवा संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मैदानी खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, भित्तीपत्रक प्रदर्शन सह विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या.या युवा संमेलनाचे बक्षीस वितरण सोमवार, दि.२ रोजी बक्षीस वितरणाचा कार्यक्रम झाला. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ.प्रकाश आनंदगावकर हे होते. तर प्रमुख उपस्थितीमध्ये पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर, विजय साळवे, रोटरी क्लबचे अध्यक्ष हनुमंत कासट, पत्रकार दिलीप झगडे, डॉ.यशवंत राजेभोसले, प्राचार्य नरेंद्र चंद्रा हे उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना डॉ.प्रकाश आनंदगावकर म्हणाले, विद्यार्थ्यांनी जे क्षेत्र शिक्षणासाठी निवडले आहे. त्या क्षेत्रात उतुंग भरारी घेऊन अनोखा ठसा निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत. यावेळी संपादक शिवाजी रांजवण यांनी आपल्या भाषणात बोलत असताना म्हणाले की, ग्रामीण भागामध्ये औषधनिर्माणशास्त्र या सारखे ज्ञान पोहचविण्याचे मोठे कार्य डॉ.राजेभोसले हे गुरूकृपा फार्मसी महाविद्यालयाच्या माध्यमातून करत आहेत. औषध निर्माते निर्माण होत आहेत भविष्यात डॉक्टर निर्माण व्हावेत अशी अपेक्षा या वेळी त्यांनी व्यक्त केली. तसेच उमेश मोगरेकर यांनी विद्यार्थ्यांनी, विद्यार्थी दशेमध्ये शिस्त बद्ध व कर्त्यव कठोर राहावे. गुरूकृपा फार्मसी महाविद्यालयात खरोखरच गुरूकुलची परंपरा चालू आहे की काय असे शैक्षणिक वातावरण पहावयास मिळत आहे. विद्यार्थ्यांनी चांगल्या मित्रासोबत मैत्री करून आपले भविष्य उज्ज्वल करावे, असे मनोगत त्यांनी व्यक्त केले डॉ.राजेभोसले यांनी सांगितले की, मागील तीन वर्ष वैश्विक महामारी असताना सुद्धा गुरूकृपा फार्मसी महाविद्यालयात शिक्षकांनी, विद्यार्थ्यांनी व पालकांनी आपल्या ध्येयापासून विचलित न होता. ऑनलाईन पद्धतीने आर्थिक संकटाला झुगारून गुणवत्तेचा चढता आलेख कायम ठेवला या बाबत त्यांनी सर्वांचे अभिनंदन केले. यावेळी विजय साळवे, प्राचार्य नरेंद्र चंद्रा यांचे समयोचित भाषण झाले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करून भाग्यश्री भोसले या विद्यार्थिनीच्या नृत्य सादरी करणाने कार्यक्रमाची सांगता झाली या वेळी या कार्यक्रमास विद्यार्थी-विद्यार्थीनी, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

# वृक्षारोपणातून जपल्या वडिलांच्या स्मृती

## ॲड.डोंगरदिवे यांचा आदर्श पायंडा

▶ प्रतिनिधी

वडवणी : तालुक्यातील चिंचाळा येथील रहिवासी असलेले ज्येष्ठ विधिज्ञ एम.ए.डोंगरदिवे यांचे वडील आश्रुबा बापूराव डोंगरदिवे (माजी कोतवाल) यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी वृद्धापकाळाने आपल्या राहत्या गावी चिंचाळा येथे दि.०३ फेब्रुवारी रोजी निधन झाले.



चिंचाळा येथील स्मशानभूमीमध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले तसेच दिनांक ०५ फेब्रुवारी रोजी रक्षा सावडणे व अस्थिविसर्जन करण्याचा कार्यक्रम झाला. ही रक्षा व आस्थी नदी किंवा गंगेला न टाकता डोंगरदिवे परिवारांनी आपल्या शेतामध्ये खड्डे खोदून यामध्ये ही रक्षा व आस्थी टाकण्यात आली व या खड्ड्यामध्ये आपल्या वडिलांची आठवण म्हणून वृक्षरोपण करण्यात आले. आपले वडील आपल्या कायम स्मरणात राहावेत. या वृक्षांची सेवा हि वडिलांची सेवा आपण करत आहोत आपले वडील आपल्या सोबत आहेत. या उद्देशाने वडिलांच्या आठवणीसाठी वृक्षरोपण करून एक आगळा-वेगळा आदर्श समाजासमोर उभा केला आहे ॲड.डोंगरदिवे हे गेल्या दहा ते बारा वर्षापासून आपल्या वडिलांची नित्यसेवा करतात सेवा करत असताना एंड डोंगरदिवे यांनी आपल्या वडीलांवर जिवापाड प्रेम करत होते वृक्षारोपण करण्याकरता डोंगरदिवे परिवार मोरे परिवार डावरे परिवार, कोल्हे परिवार, वावळकर परिवारासह बौद्धाचार्य सखाराम वावळकर, गौतम गवळी, ॲड.डोंगरदिवे, अन्साराम डोंगरदिवे, जिजाभाऊ वावळकर, डावरे सर, खिल्लारे सर, फपाळ, शैलाब डोंगरदिवे, सत्यप्रेम मोरे सह मित्र परिवार उपस्थित होते.

# अल्पसंख्याक विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कर्ज योजनेचा लाभ घ्यावा : नुमान चाऊस

▶ प्रतिनिधी

माजलगाव : मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या शैक्षणिक कर्ज योजनेअंतर्गत एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कर्ज मर्यादेत वाढ करण्यात आली आहे. आता एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त विद्यार्थ्यांना साडेसात लाख रूपयांपर्यंत शैक्षणिक कर्ज घेता येईल, अशी माहिती अल्पसंख्यांक विकास मंत्री नवाब मलिक यांनी दिली होती. यानंतर या योजनेचा पुरेपूर लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन मौलाना आझाद युवा मंचचे जिल्हाध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी केले आहे.

मुस्लिम, ख्रिश्चन, जैन, बौद्ध, शीख, पारशी आणि ज्यू या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला चालना मिळावी. यासाठी मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाकडून शैक्षणिक कर्ज योजना राबविली जात आहे. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त निगम नवी दिल्ली यांच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम शैक्षणिक कर्ज योजनेअंतर्गत सध्या एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त विद्यार्थ्यांकरिता पाच लाख रूपये कर्ज मर्यादा आहे. म्हणून आता त्याची मर्यादा वाढवून साडेसात लाख रूपये इतकी करण्यात आल्याची माहिती पटेल यांच्या वतीने देण्यात आली होती.



हीच माहिती प्रसिद्धीपत्रकाद्वारे माजलगाव तालुक्यासह बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांकरिता नौमान अली चाऊस यांनी दिली आहे. पुढे त्यांच्या वतीने असे सांगण्यात आले आहे की, मौलाना आझाद महामंडळाच्या भाग भांडवलातही राज्य शासनाने आता ७०० कोटी रूपयांपर्यंत वाढ केली आहे. त्यामुळे महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध कर्ज योजनासाठी पुरेसा निधी उपलब्ध होत आहे. या पुढील काळातही महामंडळाच्या विविध योजनांसाठी अल्पसंख्याक विकास विभागामार्फत संपूर्ण प्रोत्साहन देण्यात येईल. म्हणून सर्वच अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांनी याचा फायदा घ्यावा. अथवा योजनेबद्दल विस्तृत माहिती घेण्यासाठी ९७६६६२७९८६ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मौलाना आझाद युवा मंचचे जिल्हाध्यक्ष नुमान अली चाऊस यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# डॉ.मकरंद पत्की यांना महात्मा गांधी व्यसनमुक्ती पुरस्कार

▶ प्रतिनिधी



माजलगाव : महाराष्ट्र राज्य व्यसनमुक्ती परिषदेचा दिला जाणारा महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार संकल्प व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र माजलगाव येथील वैद्यकिय अधिकारी तथा व्यसनमुक्ती तज्ज्ञ डॉ.मकरंद पत्की यांची राज्यस्तरीय पुरस्कारांसाठी निवड झाली असून पुरस्कार वितरण मुंबई येथील विधान भवन सेंट्रल हॉल येथे दि.२४ फेब्रुवारी रोजी १२:०० वाजता होणार असल्याची माहिती विधान परिषदेचे अध्यक्ष नरहरी झिरवाळ, व्यसनमुक्ती परिषदेच्या अध्यक्षा प्रा.अंजली पाटील यांनी पुरस्कारांची घोषणा केली आहे

पुरस्कारांसाठी निवड झाल्या बद्दल प्रा.संजय कुंबेफळकर सौ. रेखा कुंबेफळकर, डॉ.कुंबेफळकर, डॉ.गजानन देशपांडे, डॉ.प्रकाश आनंदगांवकर, डॉ.उध्दव नाईकनवरे, जयश्री ठोंबरे करूणा साबळे यांनी अभिनंदन केले.



# ‘श्री मंगलनाथ मल्टीस्टेट’तर्फे शिवजयंती उत्साहात साजरी

## मंगलनाथ मंदिरातील शिवकथेमध्ये प्रतिमापुजन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : श्री मंगलनाथ मल्टीस्टेट संस्थेच्या संयोजनाने शिवकथेचे आयोजन श्री मंगलनाथ मंदिर बायपास रोड माजलगाव येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमांमध्ये युगप्रवर्तक स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज व संत शिरोमणी नरहरी महाराज यांची पुण्यतिथी शेकडो शिवभक्तांच्या उपस्थित मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

शिवजयंती निमित्ताने शिवाजी महाराजांचे पूजन माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी शिवजयंती उत्सव व शिवकथेचा लाभ घेण्याकरिता माजलगाव तालुक्याचे माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील, गोविंद बजाज, शशीकिरण गडम, डॉ.ओमप्रकाश घळे, बबनराव पाटील, सदाशिवाप्पा कानडे, सुभाष सोळंके, श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष आर.जी.कानडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र कानडे, सर्व अधिकारी, कर्मचारी वृंद व शेकडो शिवभक्त उपस्थित होते.







आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.